July/2019
Tuesday

प्रकरण - 1

# सामाजिक / धार्मिक सुधारणा चळवळी
## Socio / Religious Reforms Movements

प्रस्तावना :-

आधुनिक भारताच्या इतिहासामध्ये स्वातंत्र्यचळवळीला अधिक महत्त्व दिले जाते. स्वातंत्र्यचळवळी बरोबरच सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीला देखील महत्त्व प्राप्त झालेले आहे. भारतीय समाजात आधुनिक विचार रुजविण्याचे कार्य व लोकांना जागृत करण्याचे कार्य सामाजिक / धार्मिक सुधारणा चळवळीने केलेले आहे. ब्रिटिश राजवटीच्या कालखंडात भारतात आधुनिक शिक्षण व वृत्तपत्रांचा विकास यांमुळे पाश्चिमात्य संस्कृतीची ओळख भारतीयांना होऊ लागली.

19 व्या शतकाच्या पूर्वी भारतातील सामाजिक / धार्मिक सांस्कृतिक परिस्थिती पाश्चात्य देशांच्या तुलनेत अविकसित परंपरागत स्वरूपाची होती. अशा परिस्थितीमध्ये विशेष करुन सामाजिक व धार्मिक जीवनात सुधारणा करण्याच्या हेतूने 19 व्या शतकाच्या प्रारंभी प्रयत्न सुरु झाले.

19 व्या शतकातील सामाजिक / धार्मिक सुधारणा चळवळ सुरु होण्यापूर्वी भारतात जातीसंस्थेची बंधने अत्यंत कडक स्वरूपाची होती. ग्रंथप्रामाण्यवाद आणि परंपरा याला विशेष महत्त्व प्राप्त झालेले होते. धार्मिक कायदा, परंपरा याचा समाज जीवनावर अधिक प्रभाव होता. पुरुषप्रधान संस्कृती, सतीपद्धत, जातीयता, अस्पृश्यता, बहुपत्नीत्व, केशवपन, सामाजिक बहिष्कार ~~यांच~~ यांसारख्या असंख्य प्रथा परंपरा प्रचलित होत्या. अशा परिस्थितीमध्ये ब्रिटिशराजवटीत सामाजिक प्रबोधनाला सुरुवात झाली.

Scanned with CamScanner

July/2017
Tuesday

ब्रिटिश राजवटीमध्ये भारतातील केवळ राजकिय परिस्थितीतच बदल झाला असे नाही तर, भारतातील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक परिस्थिती वरती देखील परिणाम झालेले आहेत.
इंग्रजी शिक्षणाचा प्रभाव, पाश्चात्य संस्कृतीची ओढ, वृत्तपत्रांचा विस्तार अशा घटनांमुळे भारतीयांच्या जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलण्यास सुरुवात झाली. स्वातंत्र्य, समता, बुद्धीप्रामाण्यवाद यांसारख्या नवीन विचारांचा प्रभाव भारतीय तरुणांच्यावरती पडू लागला.
सामाजिक व धार्मिक जीवनातील अंधश्रद्धेची जागा विवेक व तर्कनिष्ठ विचारांनी घेतली. भारतीय समाजाच्या मागासलेपणासाठी अनिष्ठ रुढी, प्रथा, जबाबदार आहेत. त्या दुर केल्याशिवाय भारतीय समाजात सुधारणा घडून येणार नाहीत. अश्या प्रकारची जाणीव निर्माण झाल्याने अनेक व्यक्ती, संस्था यांनी समाज व धर्म सुधारणेच्या दृष्टीने पुढाकार घेतला. त्यामधुनच भारतात सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळी निर्माण होत गेल्या.
उदा :- ब्राम्हो समाज, प्रार्थना समाज, आर्य समाज सत्यशोधक समाज, रामकृष्ण मिशन इत्यादी.
अश्या अनेक संघटनांनी चळवळींनी सुधारणा घडविण्याच्या उद्देशाने जे कार्य केले त्यामधुनच भारतात सामाजिक प्रबोधन घडून आले.

## A. राजाराममोहन रॉय आणि ब्राम्हो समाज

प्रस्तावना :-

१९ व्या शतकाला भारतातील सामाजिक प्रबोधनाचे शतक म्हणून ओळखले जाते. याचे कारण या शतकात भारतातील सामाजिक, आर्थिक, राजकिय, सांस्कृतिक या सर्वच क्षेत्रात बदल घडून येण्यास सुरुवात झाली.
परंपरावादी जीवन जगणाऱ्या भारतीय समाजाला जागृत करण्याचे कार्य अनेक समाज सुधारकांनी केले. भारतातील व विशेषत: हिंदू धर्मातील पहिली सुधारणा चळवळ म्हणून ब्राम्हो समाजाला ओळखले जाते.



Scanned with CamScanner

या चळवळीचे जनक आधुनिक भारताचे जनक भारतीय प्रबोधनाचे आद्यप्रवर्तक म्हणून राजा राममोहन रॉय यांना ओळखले जाते.
अज्ञान, अंधश्रद्धा, जातीयता, अनिष्ठ प्रथा याविरोधात त्यांनी क्रांतिकारी स्वरूपाचे विचार मांडले. या विचारांमधूनच भारतात राष्ट्रवादी विचारांचा प्रसार सुरू झाला. सामाजिक व धार्मिक जीवनात प्रत्यक्ष सुधारणा घडवून आणण्यास त्यांनी प्रयत्न केले.
राजा राममोहन रॉय यांचा जीवनपरिचय व कार्य पुढीलप्रमाणे—

.../1/2019★ ...ed.

## जीवनपरिचय :

राजा राममोहन रॉय यांचा जन्म बंगाल प्रांतातील ~~हुगळी~~ हुगळी जिल्ह्यातील राधानगर या खेड्यात सन 1772 मध्ये झाला. रॉय यांचे प्रारंभिचे शिक्षण त्यांच्या गावामध्येच पूर्ण झाले. त्यानंतरचे पुढील शिक्षण त्यांनी पाटणा याठिकाणी पूर्ण केले. संस्कृत, अरबी, फारसी या भाषांचे अध्ययन केले. प्राचीन वेद, उपनिषदे यांचाही अभ्यास केला. इंग्रजी, लॅटिन, फ्रेंच इत्यादी परकिय भाषांचा देखील अभ्यास केला. या अध्ययनामुळे रॉय यांचा दृष्टिकोन शास्त्रिय व बुद्धिवादी झाला होता. जगातील अनेक धर्मांचा धर्मग्रंथाचा अभ्यास केल्याने त्यांना धर्मांचे मूळ स्वरूप लक्षात आले. शिक्षण पूर्ण केल्यानंतर ते कंपनी सरकारमध्ये नोकरी करू लागले. हिंदू धर्मातील अनेक प्रथा, परंपरा त्यांना अनिष्ठ वाटू लागल्या. या प्रथा धर्मग्रंथात नसून विशिष्ट वर्गाच्या स्वार्थासाठी निर्माण करण्यात आलेल्या आहेत. अशी त्यांची भूमिका झाली. या परिस्थितीमध्ये बदल करण्याच्या उद्देशाने त्यांनी सामाजिक व धार्मिक सुधारणांसाठी प्रयत्न सुरु केले. समाजसुधारणेच्या या जाणीवेमधूनच सन 1815 'आत्मिय सभा' व सन 1822 मध्ये युनिटेरियन कमिटी या संस्थांची स्थापना केली. मानव जातीचा सेवक म्हणून राजा राममोहन रॉय यांच्या कार्याचा गौरव केला जातो.
त्यांचे कार्य पुढीलप्रमाणे —



Scanned with CamScanner

1] भारताच्या आधुनिकिकरणातील भूमिका :-

भारतीय समाज हा अज्ञान, अंधश्रद्धा धर्माचा प्रभाव यांमुळे सतीपद्धत, बालविवाह, नरबळी यांसारख्या अनिष्ठ प्रथा परंपरामध्ये अडकून पडलेला आहे. याची जाणीव रॉय यांना झाली. पाश्चात्य देशातील योग्य तत्वांचा स्विकार करुन भारतातील परंपरागत स्थिती बदल करण्यासाठी त्यांनी प्रयत्न सुरु केले. सामाजिक व धार्मिक क्षेत्रात अनेक सुधारणा, इंग्रजी शिक्षणाचा पुरस्कार, नागरी हक्कांचे समर्थन, ब्राम्हो समाजाची स्थापना त्यांच्या या कार्यामधून भारतात आधुनिक विचारांचा प्रारंभ झाला. आधुनिकिकरणातील त्यांचे कार्य, योगदान, विचारात घेऊनच त्यांना आधुनिक भारताचे जनक म्हणून ओळखले जाते.

1 July 2019
Tuesday

2] सामाजिक सुधारणांविषयी कार्य :-

राजा राममोहन रॉय यांनी आधुनिक विचारांच्या मांडणीबरोबरच प्रत्यक्ष समाज सुधारणेचे कार्य देखील केलेले आहे. स्त्रियांबरोबर समानतेचे व्यवहार व वर्तन घडावे ही त्यांची मुख्य भूमिका होती. सतीप्रथेच्या निर्मुलनासाठी त्यांनी ने(?) प्रयत्न केले. त्याचा परिणाम सतीबंदीचा कायदा मंजूर झाला. विधवा स्त्रियांना पुर्नविवाहाचा अधिकार स्त्रियांना वारसा हक्कात अधिकार मिळावा यासाठी प्रयत्न केले. बालविवाह, बालहत्या, कु[illegible] केशवपन या अमानुष प्रथा नष्ट करण्यासाठी प्रयत्न केले. प्रथा, परंपरा यांच्या निर्मुलनासाठी रॉय यांना जे जनजागृतीचे कार्य केले त्यामुळेच त्यांना सामाजिक सुधारणांचे अग्रदूत म्हणून ओळखले जाते.

3] ब्राम्हो समाज / ब्राम्हो समाजाची स्थापना :

भारतातील व विशेषत: हिंदू धर्मातील पहिली सुधारणा चळवळ म्हणून ब्राम्हो समाजाला ओळखले जाते. ब्रिटिश राजवटी, ख्रिश्चन मिशनऱ्यांकडून हिंदू धर्म, संस्कृती


Scanned with CamScanner

यांवरती टिका करण्यास सुरुवात केली होती. या टिकांना प्रतिउत्तर देण्याबरोबरच भारतात सामाजिक व धार्मिक सुधारणा करणे. या उद्देशाने राजा राममोहन रॉय यांनी २० ऑगस्ट १८२८ मध्ये ब्राह्मो समाजाची स्थापना केली. सामाजिक व धार्मिक सुधारणांबरोबरच भारतीयांना मुळ हिंदू धर्माची ओळख करुन देणे. हा या संघटनेचा मुख्य उद्देश होता. रॉय यांनी वेद, उपनिषदे, या प्राचीन ग्रंथामधील हिंदू धर्माचे मुळ स्वरुप लोकांसमोर आणण्याचे महत्त्वाचे कार्य केले. वेद, एकेश्वरवाद, बंधुभाव, मानवतावाद यांचा प्रसार करण्यावर भर दिला. हिंदू धर्मातील व समाजातील अनिष्ठ प्रथा, परंपरा कश्या अनावश्यक आहे. याविषयी जनजागृती केली. ब्राह्मो समाजाचा प्रमुख उद्देश हा पुढीलप्रमाणे होता-

★ ब्राह्मो समाजाचे उद्देश :-

1] भारतीय लोकांना मुळ धार्मिक तत्त्वांची ओळख करुन देणे.
2] समाजातील अनिष्ठ चालीरिती, रुढी, प्रथा नष्ट करणे.
3] ख्रिश्चन मिशन-यांकडून हिंदू धर्मावर होणाऱ्या टिकेला प्रखर विरोध करणे.
4] धर्मांतरास विरोध करणे.
5] हिंदू धर्मात व समाजात सुधारणा घडवुन आणणे.

वरीलप्रमाणे प्रमुख उद्देशांच्या पुर्तेसाठी ब्राह्मो समाजाकडुन कार्य करण्यात आले.

12/July/2019 Friday

★ ब्राह्मो समाजाची तत्त्वे / तत्त्वज्ञान :-

1] एकेश्वरवाद :-

ईश्वर हा एकच असुन तो निर्गुण निराकार आहे. तोच विश्वाचा निर्माता आहे.

16/07/2019 Tuesday

2] मुर्तीपुजेला विरोध :-

ईश्वराचे अस्तित्व मुर्तीत किंवा वस्तुत नसल्याने मुर्तीपुजा करु नये

3] अवतारवादास विरोध :-
ईश्वर हा निर्गुण निराकार असल्यामुळे तो साकार होऊ शकत नाही. ईश्वर विविध अवतार घेतो हि चुकीची कल्पना आहे.

4] सर्वांनी परस्परांशी बंधुभावाने वागावे.

5] स्त्रीशिक्षण, विधवा-विवाह, शैक्षणिक प्रसार, इत्यादी सुधारणांचा सर्वांनी आग्रह धरावा.

6] सदाचार, नितीमत्ता, भूतदया, प्रेम यांमुळे विविध पंथ व धर्म यांमध्ये एकता निर्माण होते. त्यामुळे या मुल्यांचा स्विकार करावा.

7] सर्व धर्मातील तत्त्वज्ञानाचा आदर करणे.

8] धर्माचा खरा अर्थ मानवाची सेवा करणे, असा संदेश देऊन एकमेकांशी वावर करावेत.

वरीलप्रमाणे ब्राह्मो समाज या सुधारणा चळवळीचे तत्त्वज्ञान स्पष्ट केले जाते.

17/07/18

★ ब्राह्मो समाजाचे नेतृत्व :-
ब्राह्मो समाजाची स्थापना राजाराम मोहन रॉय यांनी केली. त्यांच्या निधनानंतर ब्राह्मो समाजाला नवचैतन्य देण्याचे काम देवेंद्रनाथ टागोर यांनी केले. त्यांनी तत्त्वबोधिनी सभा या नावाने संस्था स्थापन करून ब्राह्मो समाजाचा प्रसार ग्रामीण समाजात केला. केशवचंद्रसेन यांनी 1856 मध्ये ब्राह्मो समाजात प्रवेश केला. त्यांच्या उदारमतवादी कार्यप्रणाली मुळे ब्राह्मो समाज अधिक लोकप्रिय होऊ लागला. देवेंद्रनाथ टागोर व केशवचंद्रसेन यांच्यात तात्विक मतभेद निर्माण झाले. केशवचंद्रसेन ब्राह्मो समाजातून बाहेर पडून सन 1866

मध्ये त्यांनी भारतीय ब्राह्मो समाज याची स्थापना केली मुळचा ब्राह्मो समाज हा 'आदि ब्राह्मो समाज' या नावाने ओळखला जाऊ लागला, त्याचे नेतृत्व देवेंद्रनाथ टागोर यांनी केले.

ब्राह्मो समाजाने सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनिय कार्य केलेले आहे. समाजसुधारणेच्या चळवळीबरोबरच स्वातंत्र्याचा पहिला आवाज म्हणून देखील ब्राह्मो समाजाला ओळखले जाते. या समाजाच्या वतीने करण्यात आलेले कार्य पुढीलप्रमाणे —

* ब्राह्मो समाजाचे कार्य :—

भारतातील सामाजिक व धार्मिक जीवनात आमुलाग्र बदल सुधारणा घडवून आणण्याचे प्रयत्न ब्राह्मो समाजाने केलेले आहे. ते पुढीलप्रमाणे —

1] सामाजिक प्रबोधनाचे कार्य :—

भारतात १९ व्या शतकाच्या प्रारंभी ब्राह्मो समाजाने सामाजिक प्रबोधनाच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे. अज्ञान, निरक्षरता, परंपरावादी विचार, कर्मकांड यामध्ये जिवन जगणाऱ्या समाजाला आधुनिक विचारांची दिशा देण्याचे काम ब्राह्मो समाजाने केलेले आहे. हिंदू धर्मातील कर्मठवादी परंपरा नष्ट करण्याचा प्रयत्नदेखील या चळवळीने केलेला आहे. खऱ्या अर्थाने भारतात आधुनिक विचारांचा व नवीन सामाजिक मुल्यांचा पाया घालण्याचे काम ब्राह्मो समाजाने केल्यामुळे सामाजिक प्रबोधन घडून येण्यास सुरुवात झाली.

2] धर्म व समाज सुधारणेचे कार्य :—

राजा राममोहन रॉय यांनी ब्राह्मो समाजाच्या माध्यमातून हिंदू धर्म आणि समाजसुधारणेची चळवळ सुरु केली. १९ व्या शतकाच्या प्रारंभीपर्यंत हिंदू धर्म भारतीय समाज यांची स्थिती अत्यंत दयनिय स्वरुपाची झालेली होती. ख्रिश्चन मिशनऱ्यांनी यांचा योग्य वापर ख्रिश्चन धर्माच्या प्रसारासाठी

करण्यास सुरुवात केली होती. अशा स्थितीमध्ये सुधारणा घडवून आणण्याचे कार्य ब्राह्मो समाजाने सुरु केले.

18/07/2019 Thursday

ब्राह्मो समाजाने एकेश्वरवादाचा पुरस्कार केला. मूर्तिपूजेला विरोध केला. वेद आणि उपनिषदांच्या आधारे हिंदू धर्माचे मूळ स्वरूप समाजासमोर स्पष्ट केले. हिंदू धर्मातील दोष चुकीच्या प्रथा नष्ट करण्यासाठी प्रयत्न केले. मूर्तिपूजा, अंधश्रद्धा, तीर्थयात्रा, कर्मकांड यापासून हि चळवळ अलिप्त ठेवण्याचा प्रयत्न केला. ब्राह्मो समाजाने धार्मिक क्षेत्रात बदल सुधारणा घडवून आणण्याचे कार्य केले.

ब्राह्मो समाजाने सतीपद्धत, बहुपत्नित्व, बालविवाह अस्पृश्यता, पडदा पद्धत या प्रचलित परंपरांच्या विरोधात संघर्ष करून सामाजिक क्षेत्रात सुधारणा घडवून आणल्या. स्त्रीशिक्षण आंतरजातीय विवाह, विधवा पुनर्विवाह पुनर्विवाह यांना चालना देण्याचे कार्य केले. सामाजिक व धार्मिक सुधारणा करून भारताच्या आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत ब्राह्मो समाजाने महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

3] शैक्षणिक कार्य :-

राजा राममोहन रॉय यांनी ब्राह्मो समाजाच्या माध्यमातून शैक्षणिक संस्थांची स्थापना करून आधुनिक शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी महत्त्वपूर्ण प्रयत्न केले. स्त्रीशिक्षणाचादेखील या समाजाने पुरस्कार केला. कलकत्ता याठिकाणी इंग्लिश स्कूल, हिंदू कॉलेज, वेदांत कॉलेज यांची स्थापना ब्राह्मो समाजाने केली. परंपरागत शिक्षणाऐवजी भौतिक शास्त्रांच्या आधारे आधुनिक शिक्षण भारतीयांना देण्याचा प्रयत्न ब्राह्मो समाजाने केला.

4] वृत्तपत्रे :-

राजा राममोहन रॉय यांनी अनेक ग्रंथ लिहिलेले आहेत. वेद व उपनिषदे यांचे इंग्रजीमध्ये भाषांतर केले. रॉय यांनी ब्राह्मो समाजाच्या वतीने अनेक वृत्तपत्रे व साप्ताहिके प्रकाशित करण्यास सुरुवात केली. राजा राममोहन रॉय यांनी



Scanned with CamScanner

Vaishali

सन १८२१ मध्ये 'संवाद कौमुदी' हे बंगाली साप्ताहिक सुरु केले होते. तसेच 'मिरत उल अखबार', 'प्रिसेप्टस ऑफ जीसस' ही वृत्तपत्रे सुरु केली.

केशवचंद्रसेन यांनी 'सुलभ समाचार' या नावाने साप्ताहिक व 'इंडियन मिरर' हे वृत्तपत्र सुरु केले होते.

अक्षयकुमार दत्त यांच्या संपादनाखाली तत्वबोधिनी पत्रिका हे मासिक सुरु करण्यात आले. या सर्व वृत्तपत्रांनी भारतीय समाजात नविन विचार, हक्की यांचा प्रसार करुन समाजाची आधुनिकतेच्या दिशेने वाटचाल सुरु करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावलेली आहे.

5] महान विचारवंत व नेतृत्वाची निर्मिती :-

ब्राम्हो समाजाने राजकारण, समाजकारण, साहित्य या क्षेत्रात महत्त्वपूर्ण कार्य करणारे अनेक विचारवंत निर्माण केलेले आहेत. महर्षी देवेंद्रनाथ टागोर, केशवचंद्रसेन, अक्षयकुमार दत्त, ईश्वरचंद्र विद्यासागर, रविंद्रनाथ टागोर, सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांसारखे अनेक विचारवंत, नेते, भारतीय समाजाला देण्याचे काम ब्राम्हो समाजाने केलेले आहे.

## सारांश :-

ब्राम्हो समाज ही भारतातील समाजसुधारणेची पहिली चळवळ म्हणून ओळखली जाते. सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण सुधारणा करण्याचे कार्य या समाजाने केले. ब्राम्हो समाजाने १९ व्या शतकाच्या प्रारंभी जी बौद्धिक जागृती केली त्यामुळे स्वातंत्र्यचळवळीसाठी आवश्यक असणारी वैचारिक पार्श्वभूमी तयार झाली. सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीचा प्रारंभ बिंदू म्हणून राजा राममोहन रॉय व ब्राम्हो समाजाला ओळखले जाते.



Scanned with CamScanner

19/07/201[illegible]
Friday

## B स्वामी दयानंद सरस्वती आणि आर्य समाज :-

★ प्रस्तावना :-

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात भारतात सुरु झालेल्या सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीमधील महत्त्वपूर्ण चळवळ म्हणून आर्य समाजाला ओळखले जाते. बंगाल व महाराष्ट्र याठिकाणी सामाजिक व धार्मिक सुधारणा जनजागृतीचे कार्य सुरु असताना उत्तर भारतात या कार्याची सुरुवात स्वामी दयानंद सरस्वती यांनी केली. भारतीय संस्कृतीमधील मानवी मुल्यांचे महत्त्व लोकांना पटवून देण्याचे कार्य या चळवळीने केले. वैदीक धर्म व संस्कृती यांचे पुनरुज्जीवन पुनरुज्जीवण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य स्वामी दयानंद सरस्वती व आर्य समाज यांनी केले.

★ जीवनवृत्तांत :-

स्वामी दयानंद सरस्वती यांचा जन्म सन 1824 मध्ये गुजरातमधील मोर्वी संस्थानातील टंकारा या गावी झाला. त्यांचे कुटूंब ब्राम्हण कुटूंब होते. स्वामी दयानंद सरस्वती यांचे मुळ नाव 'मुळशंकर' असे होते. त्यांचे वडील अंबाशंकर हे धार्मिक प्रवृत्तीचे होते. त्यामुळे स्वामींना संस्कृत, वेद, धर्म इत्यादींचे शिक्षण कुटूंबामध्येच मिळाले.

स्वामी दयानंद सरस्वती यांच्या जीवनात विशिष्ट प्रसंग घडल्याने त्यांच्या जीवनाला वेगळी दिशा मिळाली. ईश्वराचे सत्य स्वरुप जाणून घेण्यासाठी ते आपल्या घरातुन सन 1845 मध्ये बाहेर पडले. सन 1860 पर्यंत भारतभर प्रवास केला. ज्ञान आणि सत्य शोधण्याचा प्रयत्न केला. स्वामी दयानंद सरस्वती यांनी थोर पंडित 'स्वामी विरजानंद सरस्वती' यांना आपले गुरु मानले. वेद आणि योग यांचा त्यांनी सखोल अभ्यास केला. हिंदू धर्माचे तत्त्वज्ञान लोकांपर्यंत पोहचवण्यासाठी संपुर्ण भारतभर प्रवास केला. त्यांनी सरस्वती सांप्रदायापासुन संन्यास स्विकारुन स्वामी दयानंद सरस्वती हे नाव धारण केले.

स्वामी दयानंद सरस्वती यांनी वैदिक धर्माचे पुनरुज्जीवन करण्यासाठी व वैदिक धर्मातील तत्वज्ञानाच्या प्रसारासाठी आर्य समाजाची स्थापना केली. आर्य समाजाच्या माध्यमातुन सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक क्षेत्रात सुधारणा घडवुन आणण्याचे कार्य स्वामी दयानंद सरस्वती यांनी केले.

## आर्य समाजाची स्थापना :-

28/07/2019 Tuesday Wed. ★ IMP

[ हिंदु धर्म, हिंदु समाज यामध्ये सुधारणा करणे तसेच भारतीय समाजातील अनिष्ट परंपरांचे उच्चाटन करुन समतेवर आधारित समाजव्यवस्था प्रस्थापित करणे. धर्मांतराला विरोध करणे. या उद्देशाने स्वामी दयानंद सरस्वती यांनी 10 एप्रिल 1875 मध्ये मुंबई येथे आर्य समाजाची स्थापना केली. ]

पंजाब प्रांतातील लाहोर याठिकाणी एक शाखा 1877 मध्ये सुरु करण्यात आली. नंतरच्या काळात लाहोर हेच आर्य समाजाचे प्रमुख केंद्र बनले. स्वामी दयानंद सरस्वती यांनी सत्यार्थ प्रकाश व वेदांवरील भाष्य या दोन ग्रंथांची निर्मिती केली. यामधुन आर्य समाजाची तत्त्वे, तत्वज्ञान त्यांनी समाजासमोर मांडले.

## ★ आर्य समाजाची तत्त्वे / तत्वज्ञान :-

ब्राम्हो समाज व प्रार्थना समाज या दोन सुधारणा चळवळीमधील आदर्श तत्वांचा स्विकार करुन आर्य समाजाने आपले तत्वज्ञान स्पष्ट केले. आर्य समाजाने आपल्या तत्त्वज्ञानामध्ये वेदांना महत्त्व दिले. आर्य समाजाने वैदिक धर्मातील तत्त्वज्ञान आणि आधुनिक बुद्धिवादी विचार यांची परस्पर सांगड घालुन आपल्या सुधारणा चळवळीचे तत्वज्ञान निर्माण केलेले आहे. ते तत्वज्ञान पुढीलप्रमाणे —

1] ईश्वर एकच असुन तो विश्वाचा निर्माता आहे. तो सर्वसाक्षी आहे.

2] वेद हे ईश्वरनिर्मित असुन त्यांचे अध्ययन करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य असुन प्रत्येकाने त्याचा प्रसार केला पाहिजे.

3] वेद अध्ययनाचा अधिकार सर्व स्त्री - पुरुषांना आहे.



Scanned with CamScanner

25/07/2019 Thursday

4] वेद हा आर्यांचा पवित्र ग्रंथ असून तो प्रमाण मानला पाहिजे.
5] प्रत्येक व्यक्तीने असत्याचा त्याग करून सत्याचा स्विकार केला पाहिजे.
6] सद्गुणांचे संगोपन व संवर्धन करण्यासाठी प्रत्येकाने नितीनियमांना अनुसरुन विचार केला पाहिजे.
7] मानवाची भौतिक, आध्यात्मिक, सामाजिक प्रगती करून मानवाचे कल्याण साधणे हाच आर्य समाजाचा मुख्य उद्देश आहे.
8] प्रत्येकाने एकमेकांशी प्रेमाने व न्यायाने वागले पाहिजे.
9] अज्ञान नष्ट करुन ज्ञानाचा प्रसार करणे हे प्रत्येकाचे ध्येय असले पाहिजे.
10] व्यक्तिगत कल्याणापेक्षा सर्वांच्या कल्याणासाठी प्रयत्नशील असावे.
11] वैदिक धर्मात इतर धर्मियांना सुद्धा प्रवेश दिला जावा. तसेच व्यक्तिला शुद्धीकरणाने वैदिक धर्मात प्रवेश मिळावा.

आर्य समाजाने वेदांच्या अभ्यासाला आपल्या तत्त्वज्ञानामध्ये महत्त्व दिलेले आहे. समाजरचनेसाठी आर्य समाजाने वर्ण पद्धतीचा पुरस्कार केला. मात्र ही वर्ण व्यवस्था जन्मावर आधारित नसून ती कर्मावरती आधारित असली पाहिजे.

26/07/19 Friday

③ आर्य समाजाचे कार्य :-

भारतातील सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीमध्ये आर्य समाजाकडून जे कार्य केले गेले, त्याचा आढावा पुढील प्रमाणे —

1) वैदिक धर्म व वेदांचे महत्त्व स्पष्ट केले. —

वैदिक धर्म हाच मुळचा हिंदू धर्म आहे. या धर्मात मुर्तीपूजा व कर्मकांड याला स्थान नाही. ईश्वराचे व विश्वाचे स्वरूप समजून घेण्यासाठी मुळ हिंदू धर्माचे तत्त्वज्ञान समजण्यासाठी वेदांचे अध्ययन केले पाहिजे. वेदांमधील माहिती, ज्ञान ही ईश्वरप्रणीत असल्याने वेद हे शुद्ध व परिपूर्ण आहे. त्यामुळे वेदांचे अध्ययन करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. अशा प्रकारे आर्य समाजाने वैदिक धर्माचे व वेदांचे महत्त्व स्पष्ट केले होते. रुढी, प्रथा, परंपरा, अंधश्रद्धा

यामध्ये अडकून पडलेल्या हिंदू धर्माला वाचवण्यासाठी स्वामी दयानंद सरस्वती यांनी 'Back to the Vedas' असा संदेश विचार आपल्या धर्मबांधवांना दिला होता.

२) सामाजिक कार्य :-

स्वामी दयानंद सरस्वती यांनी धर्मसुधारणेबरोबरच समाजसुधारणेच्या कार्याला देखील प्राधान्य दिले होते. आर्य समाजाने जातीव्यवस्थेला प्रखर विरोध केला. वर्णव्यवस्था ही व्यक्तीच्या जन्मावर नाही, तर ती कर्मावर आधारित असली पाहिजे, याचा पुरस्कार आर्य समाजाने केला. जातिव्यवस्था, हुंडा पद्धत, अस्पृश्यता, बालविवाह, बहुपत्नीत्व, पडदा पद्धत, समुद्र पर्यटन बंदी व इतर कर्मकांड यांसारख्या चालीरितींना आर्य समाजाने प्रखर विरोध केला. विधवा-पुनर्विवाह, अस्पृश्यता निवारण, स्त्री-शिक्षण यांसारख्या सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी आर्य समाजाने प्रयत्न केले.

10/07/2019
Tuesday

३) शैक्षणिक कार्य :-

आर्य समाजाने सामाजिक व धार्मिक सुधारणा बरोबरच शिक्षण प्रसाराच्या कार्यात देखील उल्लेखनीय कार्य केलेले आहे. देशाची प्रगती ही शिक्षणाच्या प्रसारावर अवलंबून असते, हे महत्त्व जाणल्यामुळे आर्य समाजाने अनेक शिक्षण संस्था, शाळा स्थापन केल्या होत्या. आर्य समाजाकडून गुरुकुल विद्यालयांची स्थापना करण्यात आलेली होती. आर्य समाजाचे प्रमुख कार्यकर्ते लाला हंसराज यांनी लाहोर याठिकाणी 'दयानंद अँग्लो वैदिक स्कूल' सुरु केले. इंग्रजी शिक्षणाबरोबर वैदिक धर्माचे शिक्षण देखील या ठिकाणी दिले जात होते. स्वामी दयानंद सरस्वती यांच्या मनातील गुरुकुल ही शाळेची संकल्पना साकारण्यासाठी स्वामी श्रद्धानंद यांनी 1902 मध्ये हरिद्वार जवळील कांगडी याठिकाणी गुरुकुल स्थापन केले. त्यांच्या नेतृत्वाखाली उत्तर भारतात अनेक ठिकाणी गुरुकुल पद्धतीच्या शाखा सुरु झालेल्या होत्या. आर्य



Scanned with CamScanner

समाजाने स्त्री-शिक्षणाला प्राधान्य दिले पाश्चात्य शिक्षण म्हणजेच आधुनिक शिक्षणाबरोबर वैदिक शिक्षण देण्याचे कार्य केले उत्तर भारताबरोबरच महाराष्ट्रात कोल्हापूर, सोलापूर, मुंबई याठिकाणी देखील शिक्षण प्रसाराचे कार्य केले. सुजान देशाभिमानी नितीमान युवकांची पिढी निर्माण करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवून ते शिक्षणाच्या माध्यमातून पूर्ण करण्याचे कार्य आर्य समाजाने केले.

4] शुद्धीकरण चळवळ :
आर्य समाजाचे सर्वात महत्त्वाचे काम म्हणजे, त्यांनी सुरु केलेली धर्म शुद्धीकरणाची चळवळ होय. ज्या लोकांनी हिंदू धर्माचा त्याग करुन ख्रिश्चन इस्लाम किंवा इतर कोणत्या धर्माचा नाइलाज म्हणून स्विकार केला होता. अश्या लोकांना पुन्हा हिंदू धर्मात परत घेण्यासाठी आर्य समाजाने धर्म / शुद्धिकरणाची चळवळ सुरु केली. मलबार याठिकाणी असंख्य हिंदूना सक्तीने इस्लाम धर्म स्विकारण्यास भाग पाडले होते. तसेच काही हिंदू लोकांनी आमिषाला बळी पडून ख्रिश्चन धर्माचा स्विकार केला होता. अश्या लोकांना स्व-धर्मात घेण्यासाठी सनातनवादी लोकांनी विरोध केला होता. परंतु आर्य समाजाने या लोकांना हिंदू धर्मात घेण्यासाठी शुद्धीकरण चळवळ सुरु केली होती.

5] स्वराज्यप्रेम व राष्ट्राभिमान :
आर्य समाज प्रखर राष्ट्रवादी असल्याने भारतीयांच्या मनात स्वातंत्र्याची भावना जागृत करण्याचे कार्य आर्य समाजाने केले. आर्य समाजाच्या अनेक कार्यकर्त्यांनी राष्ट्रीय, स्वातंत्र्य चळवळीत सहभाग घेतला. राजकिय स्वातंत्र्य प्राप्त करणे हे स्वामी दयानंद सरस्वती आणि आर्य समाजाचे प्रमुख ध्येय होते. 'स्वराज्य' हा शब्द सर्वप्रथम त्यांनी वापरला. विदेशी वस्तुंवर बहिष्कार व स्वदेशी वस्तुंचा वापर ही शिकवण लोकांना दिली. लोकांच्या मनामध्ये राष्ट्रभक्तीची भावना निर्माण केली. लाला लजपतराय, बिपीनचंद्र पाल, स्वामी श्रद्धानंद

यांसारखे अनेक देशभक्त नागरिक आर्य समाजातून निर्माण झाले. राष्ट्रीय विचारवंतांची, राष्ट्रभक्तांची व समाजसुधारकांची एक नवीन पिढी निर्माण करण्याचे कार्य आर्य समाजाने केले.

31/07/2019
wed.

सारांश :-

आर्य समाजाने वेदांना प्रमाण मानून वैदिक संस्कृती वैदिक धर्म यांमध्ये सामाजिक व धार्मिक सुधारणा घडवून आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केलेले आहे. सामाजिक व धार्मिक जागृतीबरोबरच राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करून विसाव्या शतकातील भारतीय समाजाची पायाभरणी आर्य समाजाने केली. आर्य समाजाने वैदिक संस्कृतीला श्रेष्ठत्व प्राप्त करण्यासाठी प्रयत्न केले परिणामी भारतातील एक धार्मिक व सामाजिक सुधारणेची चळवळ म्हणून आर्य समाजाला ओळखले जाते.

## C स्वामी विवेकानंद आणि रामकृष्ण मिशन

**प्रस्तावना :-**

भारतात १९व्या शतकाच्या उत्तरार्धात म्हणजेच राष्ट्रवाद निर्मितीच्या काळात भारतीय समाजात सामाजिक व धार्मिक सुधारणा स्वदेश व स्वधर्माप्रती अभिमान निर्माण करण्याचे कार्य ज्या अनेक संस्थांनी चळवळींनी केले, त्यामध्ये 'रामकृष्ण मिशन' या चळवळीचे कार्य वैशिष्ट्यपूर्ण राहिलेले आहे. अनिष्ठ प्रथा, चालीरिती कर्मकांड यांपासून समाजाची सुटका करून सामाजिक प्रबोधन घडवून आणण्याचे कार्य रामकृष्ण मिशनने केलेले आहे. या मिशनचे कार्य केवळ धार्मिक नसून ते सर्वांगीण सुधारणांसाठी होते. भारतीय संस्कृती कशी श्रेष्ठ आहे हे जगासमोर मांडून देण्याचे कार्य रामकृष्ण मिशनने केलेले आहे. स्वामी विवेकानंद यांनी त्यांचे गुरु रामकृष्ण परमहंस यांच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी जी चळवळ सुरु केली त्यालाच त्यांनी 'रामकृष्ण मिशन' हे नाव दिले होते. स्वामी विवेकानंद यांचे गुरु रामकृष्ण परमहंस यांचे जीवन आणि कार्य अभ्यासणे महत्त्वाचे

आहे, ते पुढीलप्रमाणे —

1/08/2019 Thursday

★ जीवनपरिचय :- श्रीरामकृष्ण परमहंस

रामकृष्ण परमहंस यांचा जन्म बंगाल प्रांतातील हुगली जिल्ह्यातील कामारकुपुर या खेड्यात 18 फेब्रुवारी 1836 मध्ये झाला. स्वामी रामकृष्ण परमहंस यांचे मुळ नाव गदाधर चट्टोपाध्याय असे होते. लहानपणापासूनच ईश्वर भक्तीची ओढ असल्यामुळे कलकत्ता येथील दक्षिणेश्वराच्या कालीमातेच्या मंदीरात ते पुजारी म्हणून काम करु लागले. त्या ठिकाणी त्यांनी योगसाधना केली. शंकराचार्यांचे अनुयायी तोतापुरी यांनी त्यांना संन्यास घेण्यास प्रवृत्त केले. व गदाधर ऐवजी 'रामकृष्ण' हे नाव दिले. रामकृष्ण परमहंस यांनी योग-साधना करुन नैतिक आणि अध्यात्मिक सामर्थ्य वाढवले होते. सर्व धर्मांच्या मुळाशी असणारे तत्वज्ञान त्यांनी स्पष्ट केले. ते पुढीलप्रमाणे

★ श्रीरामकृष्ण परमहंस यांचे तत्वज्ञान :-

1) सर्व धर्म हे सत्य असून धर्म हा मनुष्याला ईश्वरप्राप्ती करुन देणारा मार्ग आहे.
2) मनुष्याने धन आणि भौतिक सुखाचा ध्यास न करता ईश्वराची प्रार्थना करावी.
3) मुर्तीपुजा मान्य करुन श्रध्देला महत्त्व द्यावे, कर्मकांड नष्ट करावे.
4) मानव सेवा हाच खरा धर्म आहे.
5) चारित्र्य हे ज्ञानाऐवजी श्रेष्ठ आहे.
6) जातीसंस्था व अस्पृश्यता याला विरोध करावा.
7) स्त्रियांना आदर व सन्मानाने वागणूक द्यावी.
8) ईश्वरप्राप्तीसाठी विवेक आणि वैराग्य याची आवश्यकता आहे.

वरील प्रकारचे तत्त्वज्ञान रामकृष्ण परमहंस यांनी स्पष्ट केलेले होते. मानव धर्माचे सर्वश्रेष्ठ तत्व म्हणजे परमेश्वराचे चिंतन होय. या तत्वाचाच प्रसार त्यांचे शिष्य स्वामी विवेकानंद यांनी संपुर्ण विश्वभर केला.



Scanned with CamScanner

2/08/2019
Friday

★ स्वामी विवेकानंद - जीवनपरिचय :

स्वामी विवेकानंद यांनी रामकृष्ण परमहंस यांना गुरु मानून त्यांचे विचार व तत्त्वज्ञान विश्वभर प्रसारित करण्याचे कार्य केले. स्वामी विवेकानंद यांचे मूळ नाव नरेंद्रनाथ विश्वनाथ दत्त असे होते. स्वामी विवेकानंद यांचा जन्म 12 जानेवारी 1863 मध्ये एका श्रीमंत कायस्थ कुटुंबात झाला. कलकत्ता विद्यापिठामधून त्यांनी पदवी प्राप्त केली. स्वामी विवेकानंद यांच्यावरती जॉन स्टुअर्ट मिल, स्पेन्सर, ह्युम या पाश्चात्य विचारवंतांचा व त्यांच्या विचारांचा प्रभाव पडला होता. तत्त्वज्ञान हा त्यांचा आवडीचा विषय परमेश्वराचे अस्तित्व शोधण्याच्या प्रयत्नामुळे ते प्रथम ब्राह्मो समाजाकडे आकर्षित झाले. नंतर मात्र रामकृष्ण परमहंस यांच्या सानिध्यात आल्यानंतर त्यांचे शिष्यत्व स्विकारले.

स्वामी विवेकानंद यांनी मानवी जीवनात अध्यात्मिक जागृती घडवून आणण्यासाठी कार्य केले. संपूर्ण भारतभर त्यांनी प्रवास केला. भारतातील दारिद्र्य सामाजिक परिस्थिती, अज्ञान, हे सर्व पाहिल्यानंतर त्यावरती उपाय शोधण्यासाठी ते सतत चिंतन करू लागले. 1893 मध्ये शिकागो या ठिकाणी आयोजित जागतिक धर्मपरिषदेसाठी ते उपस्थित राहिले. आपल्या विद्वत्तापूर्ण वक्तृत्व शैलीने विश्वबंधुत्वाच्या भावनेला आव्हान करून उपस्थित श्रोत्यांची मने जिंकली. हिंदू धर्म, संस्कृती, अध्यात्म इत्यादी बाबी त्यांनी स्पष्ट केल्या. इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, अमेरिका या देशांचा दौरा करून 4 वर्षानंतर मायदेशी परतले. त्यावेळी स्वामी विवेकानंद यांची किर्ती सर्वत्र पसरलेली होती. त्यांनी आपले गुरु रामकृष्ण परमहंस यांच्या तत्त्वज्ञानाचा प्रचार करण्यासाठी एखादी संघटना स्थापन करण्याचा निश्चय केला. त्यामधूनच रामकृष्ण मिशनची स्थापना झाली.

13/08/2019
Tuesday

## * रामकृष्ण मिशन / रामकृष्ण मिशनची स्थापना :

स्वामी विवेकानंद यांनी आपले गुरु रामकृष्ण परमहंस यांचे विचार जोपासण्यासाठी व प्रसार करण्यासाठी सन 1897 मध्ये 'रामकृष्ण मिशनची' स्थापना केली. त्यानंतर सन 1899 मध्ये कलकत्ता या ठिकाणी बेलूर मठाची स्थापना केली. हा मठ रामकृष्ण मिशनचे प्रमुख केंद्र म्हणून ओळखले जाऊ लागले. 'वेदांताचे तत्त्व' हे रामकृष्ण मिशनचे ध्येय होते. मानसातील अध्यात्मिक शक्ती जागृत करणे, हा या मिशनचा मुख्य उद्देश होता. रामकृष्ण मिशनची प्रमुख उद्दिष्ट्ये किंवा तत्त्वे पुढीलप्रमाणे —

1] रामकृष्ण परमहंस यांनी उपदेश केलेली वेदांताची तत्त्वे लोकांना समजावून सांगणे.
2] वेदांबरोबरच भौतिक शास्त्रांच्या शिक्षणालादेखील महत्त्व देणे.
3] सर्व धर्मांचा तुलनात्मक अभ्यास करून सर्व धर्मांच्या अनुयायांमध्ये बंधुभावाचे वातावरण निर्माण करणे.
4] भौतिक व अध्यात्मिक कल्याणाला पोषक असे ज्ञान, विज्ञान इ.चा प्रसार करणे.
5] कर्मकांडापेक्षा ध्येयाला महत्त्व देणे.
6] मोक्षप्राप्ती ही आत्मअनुभुती ची अवस्था असून मूर्तीपूजेमुळे मनुष्याची अध्यात्मिक प्रगती साध्य होते.
7] सर्व प्रकारचे शिक्षण देवून जनतेची परिस्थिती सुधारणे.
8] मानवता हाच खरा धर्म आहे. त्यामुळे आपत्तीच्या वेळी लोकांना शक्य तितके सत्कार्य करावे.
9] उद्दिष्ट्यांच्या प्रचारासाठी आवश्यक ते वाङ्मय नियतकालिके, पुस्तके प्रसिद्ध करणे.

वरील तत्त्वज्ञानाच्या आधाराने रामकृष्ण मिशनने समाजसुधारणेचे जे कार्य केले ते पुढीलप्रमाणे —

अधिपत्रिका

14/08/2019
प्रश्न:

★ रामकृष्ण मिशनचे कार्य :-

1] - हिंदू धर्म व संस्कृतीचे श्रेष्ठत्व पटवून दिले.
रामकृष्ण परमहंस व स्वामी विवेकानंद आणि त्यांच्या शिष्यांनी भारतीय संस्कृती, हिंदू धर्म कसे श्रेष्ठ आहेत हे संपूर्ण जगाला पटवून दिले. सर्व धर्म समानता आणि मानवतेची सेवा व संदेश संपूर्ण जगाला देवून हिंदू धर्माचे महत्त्व पटवून दिले. शिकागो च्या ठिकाणी आयोजित केलेल्या विश्वधर्म सभेला उपस्थित राहून हिंदू धर्म व संस्कृतीचे तत्त्वज्ञान संपूर्ण जगाला पटवून दिले. ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या हिंदू धर्मावरील टिकेमुळे लोकांच्या मनात जो न्यूनगंड निर्माण झाला होता, तो दूर करण्याचे कार्य या चळवळीच्या माध्यमातून करण्यात आले.

16/08/2019
2] मानवी सेवेला महत्त्व :
गरीब, अज्ञानी, अशिक्षित, शारिरिक व मानसिकदृष्ट्या पिडीत लोकांची सेवा करण्यावर या मिशनने अधिक भर दिला होता. स्वामी विवेकानंद यांनी रामकृष्ण मिशनमधील सेवकांना मानवजातीची सेवा करण्याचा संदेश दिला होता. अनेक ठिकाणी दवाखाने, धर्मशाळा, अनाथाश्रम, शाळा स्थापन करून पिडीत लोकांची सेवा या मिशनने केली. नैसर्गिक आपत्तीच्या वेळी मानवतेचा दृष्टिकोन समोर ठेवून कार्य केले जात होते. मानवाच्या जीवनासाठी व विकासासाठी विचार व आचार स्वातंत्र्य किती आवश्यक आहे हे मिशनने ओळखल्याने शिक्षण प्रसाराकडे अधिक लक्ष दिले. मानवसेवा हीच ईश्वर सेवा हे प्रमाण मानून स्वामी विवेकानंद व रामकृष्ण मिशनने कार्य केले.

3] अनिष्ट परंपरा व चालीरीतींना विरोध :
भारतीय समाजाला जागृत करण्यासाठी या समाजात प्रचलित असलेल्या अनेक दोषांची जाणीव समाजाला करून त्या दोषांचे निर्मूलन करण्यासाठी स्वामी विवेकानंद यांनी प्रयत्न केले. हिंदू धर्मातील मूर्तीपूजा, कर्मकांड, अंधश्रद्धा धर्माच्या नावाखाली



Scanned with CamScanner

6)

रुढ असलेल्या धार्मिक चालीरिती याला या समाजाने प्रखर विरोध केला. जातीव्यवस्था व अस्पृश्यता यांवरती टिका केली. धार्मिक उदारता, समानता, सहकार्य याला प्राधान्य देण्यात आले. लोकांनी नविन विचार, नवीन दृष्टीकोन इ. चा स्विकार करावा. यासाठी प्रयत्न करण्यात आले होते.

5) समाजसेवेचे उपक्रम :-

मानवता हाच खरा धर्म आहे. मानवाची सेवा हीच ईश्वरसेवा आहे. असा संदेश स्वामी विवेकानंद यांनी भारतीय समाजाला दिला. भारतीय समाजातील लोकांच्या तसेच विशेषतः पिडीत लोकांच्या शारिरिक, मानसिक व नैतिक उन्नतीवर त्यांनी अधिक भर दिला. रामकृष्ण मिशनने दवाखाने, औषधालये, शाळा स्थापन करुन समाजसेवेचे व्रत हाती घेतले होते. नैसर्गिक संकटात सापडलेल्या लोकांना मदत करण्यासाठी मिशनने नेहमीच पुढाकार घेतला होता.

सारांश :-

रामकृष्ण मिशनच्या अनेक शाखा आजही भारत व भारताबाहेर कार्यरत आहेत. भारतीय सांस्कृतिक जीवनाच्या अविभाज्य घटक म्हणून रामकृष्ण मिशनला ओळखले जाते. रामकृष्ण मिशन या चळवळीने सामाजिक व धार्मिक सुधारणांबरोबरच समाजात राष्ट्रभावना देखील जागृत केली. परिणामी 20 व्या शतकातील स्वातंत्र्य चळवळीला देखील अप्रत्यक्षपणे गती मिळाली.

## दिर्घोत्तरी प्रश्न

1) राजा राममोहन रॉय यांचे समाजसुधारणेतील योगदान स्पष्ट करा.

2) ब्राह्मो समाजाचे योगदान स्पष्ट करा.

3) स्वामी दयानंद सरस्वती यांच्या कार्याविषयी माहिती द्या.

4) आर्य समाजाची तत्वे आणि योगदान स्पष्ट करा.

5) स्वामी विवेकानंद यांचे कार्य स्पष्ट करा.

6) रामकृष्ण मिशन या मिशनचे सुधारणा चळवळीमधील योगदान स्पष्ट करा.

## टीपा लिहा.

1) राजा राममोहन रॉय यांचे कार्य.
2) ब्राह्मो समाजाची तत्वे आणि कार्य.
3) स्वामी दयानंद सरस्वती यांचे कार्य.
4) आर्य समाज
5) रामकृष्ण मिशनचे योगदान.